# पेरु

**अधिक माहितीसाठी संपर्क:**
82 7373 3030/82 7373 3535

**रोपाचे नाव:** पेरु
**शास्त्रीय नाव:** सिडिअम गुआजावा
**कुळ:** मायर्टेसी
**लागवड अंतर:** 06x10, 10x10, 6x12, 8x12 8x16, 15x15 फूट किंवा 6x6 मीटर
**वाण:** L-49, तैवान पिंक, VNR बिही, रेड डायमंड.

**पेरुचे गुणधर्म:** भारत हा जगातील सर्वात मोठा पेरु उत्पादक देश आहे, (जगातील पेरुच्या 45%) आणि बिहार हा भारतात प्रथम क्रमांकावर आहे. पेरुला गरीब माणसाचे सफरचंद म्हणूनही ओळखले जाते, पेरु हा व्हिटॅमिन सी चा समृद्ध स्त्रोत आहे. पेरुची फळे आणि पानांत अनेक पौष्टिक मूल्ये व औषधी गुणधर्म आहेत. पेरु मधील उपलब्ध अँटिऑक्सिडंट्स, फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे, रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि पचन सुधारते.
**माती:** पेरुची लागवड वेगवेगळ्या प्रकारच्या मातीती करता येते परंतु चांगला निचरा होणारी, हलकी, वालुकामय चिकणमाती लागवडीसाठी योग्य आहे. पेरु हे अत्यंत क्षार सहन करणारे पीक आहे, मातीचा सामू 7.5-9.0 आवश्यक आहे. पेरुच्या लागवडी साठी पाणी साचलेली आणि जास्त कॅल्शियम कार्बोनेट असलेली जमीन टाळावी.
**हवामान:** पेरु हे उष्णकटिबंधीय फळ असून, पेरुच्या वाढीसाठी आणि विकासासाठी उष्ण आणि कोरडे हवामान आवश्यक आहे. पेरुसाठी साधारण 23-28° C तापमान आवश्यक आहे आणि वार्षिक पाऊस 100 सेमी पुरेसा आहे. साधारण 250 सेमीपेक्षा जास्त पाऊस आणि दमट वातावरण पेरु लागवडीसाठी योग्य नाही.
**उत्पादन:** लागवडीच्या 3 वर्षानंतर उत्पादन सुरु होते, लागवडीच्या तिसऱ्या वर्षी साधारण 7-8 टन/हेक्टर (25-30 किलो/झाड) 10x6 अंतरावर एवढे उत्पादन मिळते. सरासरी उत्पादन 25-30 टन/हे.
**कीटक:** पिठ्या ढेकूण, फळमाशी, मावा, खोडकिड, स्केल कीटक, सूत्रकृमि.
**रोग:** मर रोग, पेरु फळ कुज, फळावरील कैंकर



# पेरू
## L -49 (लखणऊ सरदार)

अधिक माहितीसाठी संपर्क:
82 7373 3030/82 7373 3535

**वाण:** L -49 (लखणऊ सरदार)
**लागवड दिनांक:** 10/07/2023
**लागवड अंतर:** 6 x 10 फूट
**लागवड क्षेत्र:** 3.80 R
**रोपांची संख्या:** 69

**L-49 ची वैशिष्ट्ये:** अलाहाबाद सफेदा या वाना मधून निवड केलेली, आडवी, भूप्रूष्टाला समांतर वाढ होणारी (Horizontal), उंचीला मध्यम असलेली जात आहे. कमी पाण्याची उपलब्धता आणि हलकया जमिनीसाठी अतिशय काटक असलेले जास्त उत्पन्न देणारे वाण. फळांचा आकार मोठा, गोलाकार, अंडाकृती, फळांच्या त्वचेचा रंग पिवळा, अतिशय कमी बिया असलेले मऊ गर, चवीला गोड असलेली फळे.
**उत्पादन:** लागवडीच्या 3 वर्षानंतर उत्पादन सुरु होते, लागवडीच्या तीसऱ्या वर्षी 7-8 टन/हेक्टर (25-30 किलो/झाड) 10x6 अंतरावर. सरासरी उत्पादन 25-30 टन/हे.



# पेरू
## तैवान पिंक

अधिक माहितीसाठी संपर्क:
82 7373 3030/82 7373 3535

**वाण:** तैवान पिंक
**लागवड तारीख:** 22/11/2023
**लागवड अंतर:** 6 x 10 फूट
**लागवड क्षेत्र:** 2.52 R
**रोपांची संख्या:** 46

**तैवानचे वैशिष्ट्य:** लवकर येणारे वाण, मोठ्या आकाराचे फळ (00-400 gm) आतील गुलाबी रंगाचे.टिकवण क्षमता अतिशय कमी.
**उत्पादन:** लवकर येणारे वाण, लागवडीपासून 6 महिन्यांत फळधारणा सुरू होते. लागवडीनंतर 2 ते 3 वर्षांनी व्यावसायिक उत्पादन सुरू होते. उत्पादन 35-40 किलो/झाड.



# पेरू
## रेड डायमंड

अधिक माहितीसाठी संपर्क:
82 7373 3030/82 7373 3535

**वाण:** रेड डायमंड
**लागवड तारीख:** 22/11/2023
**लागवड अंतर:** 6 x 10 फूट
**लागवड क्षेत्र:** 2.52 R
**रोपांची संख्या:** 46

**रेड डायमंडचे वैशिष्ट्य:** रेड डायमंड या जातीची फळे गोल व अंडाकृती असतात फळांची कातडी हिरवट व आतील भाग फिकट गुलाबी रंगाचा असून चवीला गोड आहे. या वनाच्या फळांचा वापर जूस, जॅम बनवण्या साठी होतो. या जातीच्या फळात सी जीवनसत्व, फायबर, मोठ्या प्रमाणात असून, फळाची टिकवण क्षमता अतिशय कमी आहे. फळातील बियांची संख्या अतिशय कमी असून (5-10 बिया) फळ मोठ्या आकाराचे आहे (400-1000 ग्राम)
**उत्पादन:** 3 रे वर्ष - 25-40 किलो/झाड



# पेरू
# VNR बिही

GVT कृषीकुल
**अधिक माहितीसाठी संपर्क:**
82 7373 3030/82 7373 3535

**वाण:** VNR बिही
**लागवड तारीख:** 22/11/2023
**लागवड अंतर:** 10 x 6 फूट
**लागवड क्षेत्र:** 1.26 R
**रोपांची संख्या:** 23

**VNR बिहीचे वैशिष्ट्य:** VNR जातीची फळे आकाराने मोठे(300-1000gm), आकर्षक, बियांची संख्या कमी असणारे आहे. जास्त प्रमानात फळे देणारे लवकर येणारे वाण. दीर्घकाळ टिकवण क्षमता. ह्या जातीच्या फळे मोठ्या प्रमाणत निर्यातीसाठी पाठवतात. फळातील उपलब्ध साखरेचे प्रमाण 10-11° ब्रिक्स.
**उत्पादन:** व्हीएनआर बिही पेरूचे झाड 30-70 किलो फळ देऊ शकते, प्रत्येक फळाचे वजन 150-200 ग्रॅम असते.

